महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३३१ वा | दिनांक : १४/११/२०२५ | वार : शुक्रवार

## शरद पवारांच्या 'तुतारी' चिन्हाचे संकट टळले : निवडणूक आयोगाकडून 'पिपाणी' चिन्ह कायमस्वरूपी रद्दबातल




**पुणे** : अजित पवार यांच्या बंडानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट पडले. यामध्ये अजित पवार यांच्या गटाला 'घड्याळ' हे मूळ चिन्ह मिळाले, तर शरद पवार यांच्या गटाला 'तुतारी वाजवणारा माणूस' हे चिन्ह देण्यात आले. मात्र, अपक्ष उमेदवारांना मिळणाऱ्या 'पिपाणी' या साधर्म्य असणाऱ्या चिन्हामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला दोन निवडणुकांमध्ये मोठा दणका बसला. याच पार्श्वभूमीवर, आता निवडणूक आयोगाने अपक्षांसाठी असलेले हे 'पिपाणी' चिन्ह कायमस्वरूपी रद्दबातल केले आहे.

निवडणूक आयोगाने घेतलेल्या या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी आनंद व्यक्त करतानाच निवडणूक आयोगाला खोचक टोला लगावला. शिंदे यांनी ट्विट करत, तुतारी चिन्हाशी साधर्म्य असलेले पिपाणी चिन्ह कायमचे वगळल्याबद्दल आयोगाचे आभार मानले आहेत. पण त्याच वेळी, झालेल्या नुकसानीचा संदर्भ देत त्यांनी निवडणूक आयोगाला खडे बोल सुद्धा सुनावले आहेत.

शशिकांत शिंदे ट्विट करत म्हणाले, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या चिन्हामुळे कार्यकर्त्यांना आणि मतदारांना मोठा गोंधळ निर्माण झाला, त्याची राजकीय किंमत पक्षाला चुकवावी लागली होती. हा निर्णय जर आधीच घेतला गेला असता, तर आज महाराष्ट्रातील आणि देशातील राजकीय चित्र नक्कीच वेगळे असते. शेवटी, उशिरा सुचलेले शहाणपण असे याला म्हणावे लागेल. निवडणूक चिन्हातून 'पिपाणी (ट्रम्पेट)' हे चिन्ह कायमचे वगळ्याबद्दल निवडणूक आयोगाचे आभार! हा निर्णय लोकशाही आणि स्वच्छ निवडणूक प्रक्रियेसाठी एक सकारात्मक पाऊल आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळालेले 'तुतारी वाजवणारा माणूस' हे चिन्ह आणि अपक्ष उमेदवारांना दिलेले 'पिपाणी' हे चिन्ह यांच्यातील साधर्म्यामुळे मतदारांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला होता. या चिन्हांमधील साधर्म्यामुळे लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर मते मिळाली आणि थेट निवडणुकीच्या निकालावर त्याचा परिणाम दिसून आला. सातारा लोकसभा मतदारसंघातून शशिकांत शिंदे यांना याच पिपाणी चिन्हामुळे पराभवाला सामोरे जावे लागले, तर बीड लोकसभेतही असाच प्रकार घडला होता.

सातारा मतदारसंघात शशिकांत शिंदे यांनी उदयनराजे भोसले यांच्या विरोधात जोरदार शड्डू ठोकला होता. मात्र, पिपाणीमुळे मतविभागणी झाल्याने त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. विशेष म्हणजे, या संपूर्ण गोंधळावर उदयनराजे भोसले यांनी सुद्धा जाहीरपणे भाष्य केले होते. या गंभीर नुकसानीच्या पार्श्वभूमीवर, आता निवडणूक आयोगाने पिपाणी हे चिन्ह कायमस्वरूपी रद्दबातल करण्याचा निर्णय घेतल्याने, शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा दिलासा मिळाला आहे.

## डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठाचे पुणे येथे लोकार्पण

**पुणे** : डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठाचे लोकार्पण पुणे येथे १६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) द्वारे सुरू करण्यात येणाऱ्या या ऑनलाइन विद्यापीठातून भोंदुगिरी ओळखण्याचे प्रशिक्षण एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ राज्यशास्त्र अभ्यासक सुहास पळशीकर यांच्या उपस्थितीत पत्रकार भवन येथे सकाळी १०.३० वाजता हा कार्यक्रम होईल. अंनिसच्या मिलिंद देशमुख, श्रीपाल ललवाणी, राहुल थोरात आणि हमीद दाभोलकर यांनी ही माहिती दिली.

या विद्यापीठातील अभ्यासक्रमांमुळे नागरिकांना वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत होईल. यामुळे भोंदूबाबा आणि बुवा ओळखणे तसेच फसवणूक टाळणे सोपे होईल. अंनिसचे कार्यकर्ते नेहमीच विद्यार्थी आणि नागरिकांशी अंधश्रद्धा निर्मूलनावर संवाद साधतात. मात्र, प्रत्यक्ष भेटींना मर्यादा असल्याने, अधिक लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी हे ऑनलाइन कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरणात वैज्ञानिक दृष्टिकोनाला महत्त्व दिले जात असतानाही, अनेक शैक्षणिक अभ्यासक्रमांत अवैज्ञानिक गोष्टींचा समावेश केला जात आहे. डार्विनच्या सिद्धांतासारखे विषय अभ्यासक्रमातून वगळले जात आहेत. या पार्श्वभूमीवर, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार आणि प्रसार करणारे अभ्यासक्रम नागरिकांना सहज उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने हे कोर्सेस तयार करण्यात आले आहेत.

सुरुवातीला या प्लॅटफॉर्मवर सहा कोर्सेस उपलब्ध असतील: वैज्ञानिक दृष्टिकोन, अंगात येणे, भुताने झपाटणे, भ्रामक वास्तुशास्त्र, छद्म विज्ञान आणि व्यसनमुक्ती.

दुसऱ्या टप्प्यात फलज्योतिष फोलपणा आणि मानसिक आरोग्य यांसारखे कोर्सेस सुरू केले जातील. १३ वर्षांवरील कोणताही नागरिक हे कोर्सेस करू शकतो. ऑनलाइन परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांच्या सहीचे प्रमाणपत्र मिळेल. परीक्षेतील प्रश्न केवळ माहितीवर आधारित नसून, आकलन तपासणारे असतील. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी www.anisvidya.org.in या वेबसाइटवर नोंदणी करावी लागेल. सर्व अभ्यासक्रम आणि परीक्षा पूर्णपणे विनामूल्य आहेत.

## भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्या अडचणीत वाढ:वारंवार समन्स बजावूनही गैरहजर



**पुणे** : भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. शिरूर कासार न्यायालयाने चित्रा वाघ यांच्या विरोधात वॉरंट जारी केले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी दाखल केलेल्या अब्रूनुकसानीच्या प्रकरणात न्यायालयाने हे वॉरंट जारी केले असल्याची माहिती मेहबूब शेख यांचे वकील अंकुश कांबळे यांनी दिली आहे.

चित्रा वाघ यांनी मेहबूब शेख यांच्याबाबत बदनामीकारक वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मेहबूब शेख यांनी न्यायालयात अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला होता. त्यानंतर या प्रकरणी न्यायालयाकडून वारंवार समन्स पाठवून देखील चित्रा वाघ हजर झाल्या नाहीत. त्यामुळे आता न्यायालयाने आज त्यांच्या विरोधात वॉरंट काढला असल्याची माहिती अंकुश कांबळे यांनी दिली आहे.

काय आहे प्रकरण?

भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी मेहबूब शेख यांच्यावर तरुणीचा छळ केल्याचा आरोप केला होता. चित्रा वाघ यांनी केलेल्या या कथित बदनामीकारक वक्तव्यामुळे पुढे हा वाद वाढला. त्यानंतर मेहबूब शेख यांनी चित्रा वाघ यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे आपली प्रतिमा आणि अब्रू धुळीस मिळाल्याचा आरोप करत शिरूर कासार न्यायालयात अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला होता. त्यानंतर न्यायालयाने चित्रा वाघ यांना वारंवार समन्स बजावून देखील त्या न्यायालयात हजर झाल्या नव्हत्या. आज अखेर न्यायालयाने चित्रा वाघ यांच्या विरोधात वॉरंट जारी केले आहे. न्यायालयाने अनेक वेळा समन्स पाठवले, मात्र चित्रा वाघ यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे न्यायालयाने पुढील प्रक्रिया म्हणून वॉरंट जारी केले असल्याची माहिती शेख यांचे वकील अंकुश कांबळे यांनी दिली आहे.

तरुणीवर बलात्कार केल्याचा शेख यांच्यावर केला होता आरोप

मेहबूब शेख यांच्यावर एका तरुणीने बलात्कार केल्याचा आरोप केला होता. त्यानंतर चित्रा वाघ यांनी आक्रमक पवित्रा घेत त्या तरुणीच्या बाजूने लढा देत शेख यांच्यावर अनेक आरोप केले. परंतु, त्यानंतर काही दिवसातच या तरुणीने आपली भूमिका बदलत यू-टर्न घेतला. इतकेच नाही, तर या तरुणीने थेट चित्रा वाघ यांच्याच विरोधात तक्रार दाखल केली होती. त्यामुळे या प्रकरणाला वेगळेच वळण लागले होते.

या प्रकरणी चित्रा वाघ यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले होते की, राजकारणात काम करताना अशा घटना किंवा अनुभव नवीन नसतात. आम्ही त्या मुलीला पहिल्या दिवसापासून मदतच केली होती. आम्हाला जिथे-जिथे तपास यंत्रणा बोलावतील तिथे आम्ही गेलो आणि सहकार्य केले. असे काही अनुभव आले म्हणून आम्ही काम करणे थांबवले नाही. आम्ही काम करतच राहिलो. आम्हाला पूर्ण कल्पना होती, ज्या ठिकाणी अशी राजकीय धोंड येतात त्या ठिकाणी अशा अडचणी उद्भवणे स्वाभाविक असते. त्यामुळे अशा अडचणींना सामोरे जाण्यास आमची तयारी होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ नोव्हेंबर २०२५


## थंडी

थंडीत खाऊ
सफरचंद लाल लाल
खारीक खोबरे खाऊन
गोबरे करू गाल

हात पाय शेकू
शेकोटीजवळ बसून
सूर्यनमस्कार घालू
कंबर कसून

आई देईल हाती
मेव्याचे लाडू
हुडहुडी भरल्यावर
उबदार गोधडीत दडू

अंग गेले गारठून
बोचणाऱ्या गार वाऱ्यात
स्वेटर, कानटोपी घालून
मिरवायचे तोऱ्यात

गृहपाठाला मारायची नाही
कधीच दांडी
रोज शाळेला जायचे
असो कितीही थंडी




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


## जालना झोन आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या खेळाडूंचे नेत्रदीपक यश




**जालना:** दि. १० व ११ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या जालना झोन आंतर महाविद्यालयीन ऍथलेटिसिस स्पर्धेत बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या खेळाडूंनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे.

या सर्व खेळाडूंची सेंट्रल झोन आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.सहभागी विद्यार्थी: पुरुष संघ निखिल सुरसे १००मीटर रील रेस प्रथम, भालाफेक द्वितीय. जयकुमार साळवे १०० मीटर रिले रेस प्रथम, ५००० मी. रेस द्वितीय.निखिल सदावर्ते १०० मीटर रेस प्रथम, लांब उडी द्वितीय.सौरभ शिंदे १०० मीटर रेस प्रथम. महिला संघ वैष्णवी कांबळे, थाळीफेक, प्रथम. गिरीजा टाकळकर १५०० मीटर रेस प्रथम. या यशाबद्दल प्राचार्या डॉ. कविता प्राशर यांच्यासह महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळाने सर्वांचे अभिनंदन केले आहे. यावेळी क्रीडा संचालक डॉ भिकुलाल सले, क्रीडा समितीचे सदस्य डॉ. रवींद्र शिंपी, डॉ. कुणाल देशपांडे, डॉ. भारत उगले व श्री. अनिल जाधव हे उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने मैदानी स्पर्धेत 'जनरल चॅम्पियनशिप' पदक मिळवले



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील विद्यार्थ्याने धाराशिव येथे पार पडलेल्या मैदानी स्पर्धेत एकूण १८ पदके प्राप्त करून जिल्ह्याचे 'जनरल चॅम्पियनशिप'पदक खेचून आणले. यामुळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी मुलांना प्रमाणपत्र व पदक देऊन त्यांचा गौरव करुण मार्गदर्शन केले.

सरांना यावेळी विद्यार्थ्यांना केवळ जिल्ह्यात नव्हे तर विद्यार्थ्यांनी मेहनत, कष्ट व जिद्दीच्या बळावर राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर, आंतरराष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त करावे तसेच विद्यार्थ्यांना खेळात चालना मिळावी यासाठी केंद्र शासनाने खेलो इंडिया या स्पर्धा आयोजित केल्या आहे तरी जास्तीत जास्त युवकांनी या स्पर्धेत भाग घ्यावा व आपले खेळामध्ये नावलौकिक कमवावे असे आव्हान यावेळी केले.

या सत्कार कार्यक्रमासाठी डॉ विलास इंगळे, खेळ विषयाचे विभाग प्रमुख प्रा विजय पवार डॉ राजू सूर्यवंशी, प्रा गोविंद गायकवाड कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, प्रा शैलेश महामुनी, राजकुमार सोनवणे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. विजेते खेळाडुभोसले नामदेव धावणे ५ कि मिटर प्रथम, पुजारी प्रथमेश ८०० मिटर प्रथम व १० किमी . द्वितीय ' रिले मुले प्रथम ४ X ४०० झंपले सिद्धु , सास्तुरे किरण ,बनसोडे आकाश , हाके प्रशांत, जमादार कृष्णा लांबऊडी प्रथम, प्रेमनाथ जमादार भाला फेक द्वितीय , होगाडे चंदाप्पा ५ किमी द्वितीय, हाके प्रशांत १००,२०० मि द्वितीयझंपले सिद्धू १५०० मीटर तृतीय ,शेख सानिया १०० मीटर प्रथम व लांब ऊडी प्रथम ,जमादार राधा गोळा फेक द्वितीयमम्माळे राधिका २०० मी व ४०० मी द्वितीय, रिले मुली ४x ४०० जमादार राधा,मम्माळे राधिका,शेख सानिया सुर्यवंशी राजनंदिनी प्रथम व ५ किमी,१० किमी द्वितीय प्राप्त करून घवघवीत यश प्राप्त करून सर्वसाधारण विजेते पद प्राप्त केले.

या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष मोरे सर्व संचालक मंडळ यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## इकरा पब्लिक शाळेत संविधान जागरुकता कार्यशाळा संपन्न




**जळगाव** : ता. १३ नोव्हेंबर : स्वतंत्र भारताच्या नागरिकांना संस्कारित करणारी भारतीय संविधानातील मौलिक तत्त्वे, संवैधानिक हक्क आणि कर्तव्ये ही शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जागरुक नागरिक बनवण्यासाठी इकरा शिक्षण संस्था अंतर्गत प्रत्येक शाळांमध्ये भारतीय संविधान जागृतीचे विविध कार्यक्रम राबवले जात आहेत.

कायदे म्हणजे काय? कायदे कशासाठी? राज्यघटना नेमका काय प्रकार आहे?असे अनेक प्रश्न बालमित्रांना पडतात.

या पार्श्वभूमीवर इकरा संस्थेचे अध्यक्ष डॉ.अ.करीम सालार यांनी तनिष ठाकूर (वर्धा)व निखिल सर (पुणे) यांची संविधान जागरुकता व्याख्याचे आयोजन केलं दोघांनी PPT च्या साहाय्याने विद्यार्थ्यांना संविधानाची सखोल माहिती दिली

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ नोव्हेंबर २०२५


## प्रो. डॉ. अनिल क्षीरसागर यांचे दु:खद निधन



**छत्रपती संभाजीनगर :** शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख व प्रसिद्ध अभ्यासक, लेखक व संशोधक प्रो. डॉ. अनिल क्षीरसागर (वय ५४) यांचे मंगळवार दि. १२ नोव्हेंबर, २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता दु:खद निधन झाले.शनिवार दि. ८ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे ७ वाजता त्यांना ब्रेन स्ट्रोक आल्याने छत्रपती संभाजीनगर येथील सिटी केअर संटर हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते.

उपचार सुरू असताना मेंदूत रक्तस्त्राव झाल्याने मंगळवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.डॉ. क्षीरसागर हे शिस्तप्रिय, विद्यार्थीप्रिय आणि संशोधननिष्ठ प्राध्यापक म्हणून परिचित होते. वनस्पतीशास्त्र विषयातील त्यांचा अभ्यास आणि विद्यार्थ्यांविषयीची तळमळ यामुळे ते सर्वांच्या मनात घर करून होते. त्यांनी वनस्पतीशास्त्र विषयावर आधारित “Diversity of Cryptogams”, “Plant Ecology”, “Gymnosperms & Palaeobotany” आणि “Plant Physiology” ही चार महत्त्वपूर्ण पुस्तके प्रकाशित केली होती. महाविद्यालयातील सायन्स क्लब, अ‍ॅग्रो फोरम, बॉटनिकल गार्डन, मेडिसिनल प्लांट गार्डन, पॉलीहाऊस आणि भिंती पत्रक यांसारख्या विद्यार्थी-केंद्री उपक्रमांच्या आयोजनात त्यांचा उत्साही सहभाग होता.

नॅक मूल्यांकन प्रक्रियेत मुख्य समन्वयक म्हणून त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले.निसर्गाशी आत्मीय नाते असलेल्या डॉ. क्षीरसागर यांना वॉकिंग, व्यायाम व ट्रेकिंगचा विशेष छंद होता. त्यांनी अनेक सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमात सहभाग घेतला होता. त्यांच्या शांत, संयमी आणि मृदू स्वभावामुळे ते विद्यार्थ्यांपासून सहकाऱ्यांपर्यंत सर्वांचे जवळचे सहकारी बनले होते.त्यांच्या निधनाने महाविद्यालयीन आणि शैक्षणिक विश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. मानसिंह पवार, संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. व्ही.एन. भोसले , प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.अंत्यविधी बुधवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता त्यांच्या मूळगावी घोडदे, ता. साक्री, जि. धुळे येथे होणार आहे.त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार आहे.डॉ. क्षीरसागर यांच्या निधनामुळे “एक आदर्श शिक्षक, संशोधक आणि माणुसकीचा दीप विझला”, अशा शब्दांत सहकाऱ्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

## मुख्यमंत्री साहेब, अजून किती बळी हवेत? शेतकऱ्याने पुन्हा आत्महत्येचे पाऊल उचलले



**बुलढाणा (महेश मुंढे) :** बुलढाणा जिल्ह्यात पुन्हा एकदा शेतकऱ्याच्या आत्महत्येची हृदयदावक घटना समोर आली आहे, सततचे दुष्काळ, पावसाची अनिश्चितता, उत्पादन खर्चाची दरवाढ, दर मात्र स्थिर या सगळ्यांच्या संगमातून हातबल झालेल्या शेतकऱ्याने आज आपले जीवन संपवले.

या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली असून राज्य सरकारच्या धोरणावर तीव्र टीका सुरू झाली आहे, याबाबत सविस्तर वृत्त असे की राहेरी शिवारातील ताड शिवनी लिहिलेल्या पाटीजवळ लिंबाच्या झाडाला रामकिसन विश्वनाथ शितोळे वय वर्ष 53 राहणार ताडशिवनी यांनी आत्महत्या केली सदर घटनेत सदर घटनेची माहिती भागवत शिवाजी शितोळे यांनी पोलीस स्टेशन किनगाव राजा यांना कळवली मृत शेतकरी हा शेतीवरच अवलंबून होता शेतीतील उत्पादन खर्च भागवणे बँकेच्या कर्जाची परतफेड करणे खतांच्या वाढत्या किमती आणि बाजारात मिळणारे कमी दर या चक्रात अडकला होता, या आर्थिक आणि मानसिक ताण-तणावाचा शेवट आत्महत्येत झाला.

सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस हेडकॉन्स्टेबल काकड बक्कल नंबर ४२० पोलीस स्टेशन किनगाव राजा यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व मार्ग नंबर ३२ / २०२५ कलम १९४ बी एन एस एस प्रमाणे दाखल करून ठाणेदार संजय मातोंडकर पोलीस स्टेशन किनगाव राजा यांचे आदेशावरून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबलविश्वनाथ काकड बक्कल नंबर ४२० हे करत आहेत.

स्थानिक शेतकरी संघटना केवळ या प्रश्नावर घोषणा करतात परंतु प्रत्यक्षात कृती होत नाही कर्जबाजारीपणा आणि बाजारातील अन्यायकारक दर यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनत चालली आहे याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.






## प्रा. डॉ.अनिल क्षिरसागर यांना घोडदे, साक्री या मुळ गावी अखेरचा निरोप



**कन्नड (प्रतिनिधी) :** शिवाजी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील वनस्पती शास्त्र विभागाचे प्रमुख पुष्प तज्ञ प्रा. डॉ. अनिल क्षिरसागर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांना त्यांच्या मूळ गावी घोडदे तालुका साक्री जि. धुळे येथे भावपूर्ण वातावरणात अखेर संदर्भ देण्यात आला याप्रसंगी बोलताना प्राचार्य विजय भोसले म्हणाले की, आपल्या कामाच्या व विद्यार्थ्यांच्या प्रती ते समर्पित होते. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाने एक रत्न गमावले आहे. यावेळी उप प्राचार्य बी. के मगर ,कवयित्री प्रा. डॉ.प्रतिभा अहिरे ,तिफणकार डॉ. शिवाजी हुसे, प्रा. डॉ. प्रकाश खेत्री, प्रा.एस .एन. पवार, प्रा . प्रशांत संगई, प्रा. डॉ.व्ही. पी. देशपांडे,उप प्राचार्य अभय आहेर,प्रा . रामचंद्र झाडे,प्रा.सुनिल गोरडे,प्रा. जगदीश बोंडे,प्रा. रविंद्र घोती,प्रा. के.एल. भानुसे, संपादक प्रा. संजय भालेराव,प्रा.बी. के. मगरे ,प्रा . गोविंद बुरसे, ग्रंथपाल संतोष देशमुख,प्रा. टि. जे. जाधव,प्रा. आर. टी. नागे,प्रा. अभिजित मांडे,प्रा. निशिकांत संगई,आदिंसह मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते...

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ नोव्हेंबर २०२५

# बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार

14 नोव्हेंबर हा दिवस भारतात 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे विशेष महत्त्व असे की हा भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जयंती दिवस आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंना बालकांविषयी अपार प्रेम होते. त्यांच्या हृदयात मुलांप्रती जिव्हाळा, स्नेह आणि करुणा होती. ते म्हणत, "आजची मुले उद्याचा भारत घडवतील. त्यांच्यावर देशाचे भविष्य अवलंबून आहे." खरंच, एक समाज, एक राष्ट्र अथवा एक संस्कृती किती प्रगत, संवेदनशील आणि सुजाण होईल याचा पाया त्याच्या बालकांच्या संगोपनात दडलेला असतो. 'बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार' हा विचार केवळ एक घोष नव्हे तर एका संपन्न, न्याय्य, प्रगतिशील आणि मानवतावादी समाजव्यवस्थेची मुळाक्षरे आहे. मानवसमाजाचे अस्तित्व चालू ठेवणारा, त्यात बदल, विकास आणि सुधारणांची बीजांकुरे पेरणारा घटक म्हणजे 'बालक' होय. त्यामुळे बालकांचे संगोपन, संरक्षण, शिक्षण आणि व्यक्तित्वविकास ही समाजाची केवळ नैतिक जबाबदारी नाही तर अस्तित्वाची गरज आहे.बालक हा जन्मतः निष्पाप, कोवळा, कोरा आणि जगाविषयी उत्सुकतेने भरलेला असतो. हा कोरा कागद समाज, कुटुंब, शाळा, सांस्कृतिक संस्था, माध्यमे आणि आजूबाजूच्या परिस्थितीच्या स्पर्शाने आकार घेतो. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता बालक समाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून 'माणूस' म्हणून घडतो. या समाजिकीकरणाच्या प्रवासात बालकाला जे मूल्य, नैतिकता, संस्कार, दृष्टीकोन आणि जीवनपद्धती देण्यात येते तीच पुढील पिढीचा कणा बनते. त्यामुळे बालकांचे संगोपन हा वैयक्तिक नाही तर सामाजिक गुंतवणुकीचा भाग आहे. ज्या समाजात बालकांना सुरक्षित वातावरण, प्रेम, शिक्षण आणि संधी उपलब्ध होते तो समाज पुढे जाऊन विकासशील आणि समतामूलक होतो. उलट, ज्या समाजात बालकांना दुर्लक्षित, शोषित आणि उपेक्षित ठेवलं जातं तिथे असमानता, हिंसा, अन्याय आणि अत्याचार वाढतो.भारतीय समाजरचनेत बालकांची स्थिती पाहिली तर एक चित्र आशादायी तर दुसऱ्या बाजूला चिंताजनक आहे. एकीकडे मुलांचे हक्क, शिक्षण आणि संरक्षण यासाठी कायदे, धोरणे आणि शासकीय योजना अस्तित्वात आहेत. 'मुलांकरिता मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार अधिनियम 2009', 'बालकांचे संरक्षण (POCSO) कायदा', 'बालकल्याण समित्या', 'अंगणवाडी योजने'पासून 'बाल आरोग्य राष्ट्रीय कार्यक्रमां'पर्यंत अनेक उपक्रम राबवले जात आहेत. परंतु वास्तवात अजूनही शिक्षणाऐवजी मजुरी करणारी मुले, रस्त्यावर भटकणारी निराधार मुले, कुपोषणाची झळ सोसणारी बालके, तस्करी आणि अत्याचारांची बळी पडणारी मुले, सामाजिक-आर्थिक विषमतेमुळे शाळेबाहेर पडणारी मुले हा कटू अनुभव आपल्या समाजात दिसतो. समाज कितीही प्रगत झाल्याचे उदाहरण दिले तरी बालकांच्या चेहऱ्यावरची असुरक्षितता, भीती, उपासमार किंवा असमान संधींची वेदना समाजाच्या अंतरात्म्याला खणखणीत प्रश्न विचारते.बालकांना सुरक्षित आणि पोषक वातावरण देण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे 'कुटुंब' होय. कुटुंब ही बालकाची पहिली शाळा आणि आई-वडील हे पहिले शिक्षक आहेत. पण पाहिलं तर आधुनिक काळात कुटुंबसंस्था मोठ्या प्रमाणात बदलत चालली आहे. आर्थिक ताण, स्थलांतर, संधींची स्पर्धा, माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव, कुटुंबातील संवादाचा अभाव, पालकांचे व्यसनाधीन आणि मानसिक तणावग्रस्त होणे यामुळे बालकांवर गंभीर परिणाम दिसतो. मुलांच्या भावनिक गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत तेव्हा बालक अंतर्मुख, अस्वस्थ, आक्रामक किंवा तुटक बनतो. समाजात आज वाढणारी हिंसक वर्तणूक, नैराश्य, आत्महत्या, अभ्यासाविषयीचा ताण, वर्तनातील बदल हे फक्त वैयक्तिक नव्हे तर सामाजिक संकेत आहेत. बालकांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे त्यांच्या भविष्यावर, आणि विस्ताराने देशाच्या भविष्यावर आघात आहे.शाळा हा बालकांच्या विकासाचा दुसरा महत्त्वाचा स्तंभ होय. शाळा केवळ ज्ञान देण्याचे केंद्र नसून व्यक्तिमत्वविकास, मूल्यसंस्कार, सामाजिक जाण, नेतृत्वगुण, सहकार्य, सहिष्णुता आणि मानवी संवेदना विकसित करण्याचे स्थान आहे. शिक्षण हा केवळ गुण, परीक्षांचे निकाल, शिष्यवृत्ती किंवा प्रमाणपत्र यापुरता विषय नाही. शिक्षण म्हणजे जागृती, विवेक, विचारशक्ती, प्रश्न विचारण्याची क्षमता, निर्णयक्षमता आणि स्वतःचा स्वभाव ओळखण्याची प्रक्रिया. आज शिक्षण व्यवस्थेत अनेक सुधारणा होत आहेत, पण शिक्षणात 'मानवता' आणि 'सहजतेला' टिकवून ठेवणे ही खरी कसोटी आहे. शिक्षक हा केवळ अध्यापन करणारा व्यक्ती नसून बालकाच्या मनाचा शिल्पकार आहे. शिक्षकाच्या एका शब्दाने, एका स्पर्शाने, एका प्रोत्साहनाने बालकाचे आयुष्य आकार घेऊ शकते. म्हणून शिक्षक-विद्यार्थी नात्यातील मानवी स्पर्श टिकुन राहणे अत्यावश्यक आहे.आजचे युग विज्ञान आणि माहिती-तंत्रज्ञानाचे आहे. मोबाइल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमे आज बालकांच्या हातात सहज उपलब्ध आहेत. यामुळे ज्ञानाचा अवकाश नक्कीच वाढला आहे. परंतु त्याचबरोबर भौतिकवादी, कृत्रिम, आभासी आणि बनावट मूल्यांचे जग देखील बालकाला ओढू लागले आहे. त्यामुळे बालकांना तंत्रज्ञानाचा सुजाण आणि संतुलित वापर शिकवणे ही वेळेची गरज आहे. नैतिकता, मूल्यसंस्कार, सहानुभूती, विनम्रपणा, संवादकौशल्य, निसर्गावरील प्रेम आणि मानवी जीवनाच्या मूळ भावनांची जपणूक करणे हे डिजिटल युगात अधिक महत्वाचे ठरते.'बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार' हा विचार तेव्हाच साकार होतो, जेव्हा बालकांना केवळ जिवंत राहण्याचा हक्क नव्हे, तर वाढण्याचा, स्वप्न पाहण्याचा, व्यक्त होण्याचा आणि माणूस म्हणून आदर मिळण्याचा हक्क दिला जातो. प्रत्येक बालक हे मूलतः संभाव्य प्रतिभेचे केंद्र असते. ते कशात उत्तम आहेत, त्यांच्या मनाची दिशा काय आहे, त्यांची स्वप्ने कोणती आहेत हे ओळखणे ही मोठ्यांची जबाबदारी आहे. सर्व मुले एकसारखी नसतात, त्यांची वाढ, क्षमता, आवडीनिवडी, भावनिक गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे त्यांना समान संधी देणे म्हणजे प्रत्येकाला त्याच्या वैशिष्ट्याप्रमाणे विकसित होऊ देणे होय.यासाठी कुटुंब, शाळा, समाज, शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे या सर्वांनी एका दिशेने प्रयत्न करणे गरजेचे आहे. बालकांच्या विकासात गुंतवणूक करणे म्हणजे पायाभूत सुविधांमध्ये नव्हे तर मानवी विकासात गुंतवणूक करणे होय. ही गुंतवणूक कधीच वाया जात नाही, उलट ती एक संस्कृती, एक राष्ट्र, एक परिपूर्ण समाज घडवते.14 नोव्हेंबरचा 'बालदिन' हा केवळ आनंद, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम किंवा गोड खाऊचा दिवस नाही. हा दिवस बालकांच्या प्रश्नांना, त्यांच्या हक्कांना, त्यांच्या भविष्याला, त्यांच्या संरक्षणाला आणि त्यांच्या स्वप्नांना गांभीर्याने पाहण्याची स्मृती आहे. आज आपण जर प्रत्येक बालकाला सुरक्षित, सन्मानित, शिक्षित, प्रेमाने भरलेले आणि संधींनी समृद्ध वातावरण दिले तर उद्याचा समाज अधिक सक्षम, न्याय्य, समतामूलक, संवेदनशील आणि मानवतावादी असेल. कारण की "आजचे बालक म्हणजे उद्याचा नागरिक, उद्याचा समाज, उद्याचे राष्ट्र आहे." म्हणूनच प्रत्येकाला हे जाणण्याची गरज आहे की आजचे बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार आहेत.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. क्र. 9960103582**
bagate.rajendra५@gmail.com

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002